# प्रेसनोट

**मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकुण 1100 दिव्यांग लाभार्थींना पेन्शन योजनेचा लाभ**

मिरा भाईंदर शहरातील अपंगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाहाकरिता इतर लोकांवर अवलंबुन राहावे लागते. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबवण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत, दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत गेली 4 वर्ष दिव्यांगांना पेन्शनच्या स्वरुपामध्ये आर्थिक मदत करण्यात येते. सन 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्या निर्देशानुसार 40% ते 70% दिव्यांगत्व असलेल्या 362 दिव्यांगांना लाभार्थी 10,000 रु.प्रमाणे, 71% ते 95% दिव्यांगत्व असलेल्या 351 दिव्यांगांना 13,000/- रु.प्रमाणे 96% ते 100% दिव्यांगत्व असलेल्या 348 दिव्यांगांना 15,000/- रु प्रमाणे पेन्शन असे एकुण 1061 दिव्यांगांना लाभ देण्यात आलेला आहे. अपंगत्व असलेल्या 39 विदयार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.